(Special issue)
Vidyawarta®
Peer Reviewed International Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Samiksha

Vol-01
March – 2018

|| Editor ||
Prof.Virag S.Gawande Dr.Sanjay j. Kothari
Dr. Dinesh W.Nichit

Published By
Sant Gadge Maharaj Art's, Comm. & Sci. Collage Walgaon, Dist.Amravati
&
Aadhar Social Research Development Training Institute, Amravati.

# Vidyawarta™

International Multilingual Research Journal

Special Issue

# Samiksha

VOL - 1

March – 2018

**Editor**

Prof.Virag S.Gawande

Dr.Sanjay j. Kothari

Dr. Dinesh W.Nichit

**Published By**

Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage Walgaon
Dist. Amravati &
Aadhar Social Research Development Training Institute, Amravati.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# ADVISORY BOARD

**Prof. Virag Gawande**
**Director,**
Aadhar Social Research &
Development Training Institute, Amravati.

**Prof.Dr. Sanjay j. Kothari**
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage,
Chandur Bazar Dist. Amravati

**Prof.Dr. Dinesh W. Nichit**
**Principal,**
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage,
Walgaon Dist. Amravati

**Dr. Bhagyashree A. Deshpande**
Associate Professor,
Dr. Panjabrao Deshmukh College of Law,
Amravati.

**Dr. Dhnyaneshwar Yawale**
Sant Gadge Maharaj Mahavidyalay Walgaon,
Dist. Amravati,

**Dr. Kundan Ajabrao Alone**
Ramkrushna Mahavidyalaya,
Darapur Dist. Amravati,

**Dr. Sharda S. Gawande**
**Principal,**
Prof. Rajabhau Deshmukh Kala.
Mahavidyalaya,
Nandgaon Khandeshwar,. Dist: Amravati.

**Dr.Prshant R.Deshmukh**
Matoshri Anjanabai Mundafale College,
of Social Work & Arts Narkhed Dist. Nagpur

**Dr.Rajendrya Havre**
**Principal,**
Mahila Arts And Commerce College,
Chandur Railway Chandur Railway – 444904.
Dist – Amravati (M.S.).

**Prof Shabab Ahmed Rizvi**
M.A (Economics)M.Phil (Economics) Mba(Hr)
Pillai College Of Arts Be Commerce And
Science New Panvel Panvel, Navi Mumbai,
Maharashtra 410206

**Dr Aruna Shrirampant Wadekar ,**
Mcom,Dbm,Mphil, Phd,
Mahila Mahavidyalaya Amravti..

**म.ची धोरणात्मक कार्यक्रमांची फलश्रुती :-**

संबंधीत उपक्रमांवरून स्पष्ट होते की, माविम ही महिलांच्या आर्थिक विकासाला चालना देणारी एक योजना म्हणून यशस्वी ठरते.

कमी पैशात उद्योग सुरु करून आर्थिक दृष्ट्या सुदृढ बनविण्याकरीता माविमअंतर्गत येणारे कार्य आर्थिक विकासाला पूरक ठरते.

१) प्रकल्प योजना यशस्वी होण्याकडे विशेष लक्ष पुरविल्या जाते.

२) ज्यातून फायदा होईल आणि खर्चाचा पुरेपूर मोबदला मिळेल अशाच 'कल्याणकारी' कामांना प्राधान्य दिल्याचे दिसून येते.

३) स्वयंरोजगार आणि उद्योग गट यांच्याकरीता कोणत्या संधी उपलब्ध आहेत याचा शोध घेण्याचे कार्य माविम सातत्याने करते. त्यामुळे महिलांना आर्थिक फायदा मिळतो.

**संदर्भ सूची :-**

१. कौटुंबिक संसाधनांचे व्यवस्थापन आणि आंतर सजावट : २, प्रा. त्रिवेणी फरकाडे आणि सुलभा गोंगे, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर (सप्टेंबर २०१७)

२. स्त्री विकासाच्या पाऊलखुणा, डॉ. स्वाती कर्वे, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे (ऑगस्ट २००३)

३. महिलांसाठी स्वयंरोजगाराच्या १०१ वाटा : श्री एस.बी. पवार, श्रीकांत प्रिंटर्स, शनिवार पेठ पुणे (फेब्रुवारी २०१७)

**31**

## घरकाम करणा-या (मोलकरीण) महिलांच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन( विशेष संदर्भ : अमरावती शहरातील अर्जूननगर परिसर)

प्रा. डॉ. सुभाष के. पवार
सहा. प्राध्यापक
स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय,
नांदगाव पेठ. ता. जि. अमरावती.

==========**********========

प्रास्तावना : प्राचीन भारताच्या इतिहासात भारतीय महिलांचे असलेले स्थान व भुमिका आणि आजच्या अत्याधुनिक महिलांची भुमिका यामध्ये निश्चितच बदल झालेला आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, कौटुंबिक या सर्वच क्षेत्रात भारतीय महिलांची भुमिका अत्यंत महत्वाची आहे. देशाच्या संस्कृतीचा आरसा कौटुंबिक मुल्यांवर आधारित असतो. मुलभूत अधिकाराची जोपासणा रुजविण्याचे काम महिलांकडुन होतांना दिसून येते.

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये पुर्वीपासुनच स्त्रियांना निम्न स्थान देण्यात आले आहे. इथल्या स्त्रियांना धार्मिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रापासून हेतूपूर्वक दूर ठेवण्यात आले. जगातील सर्वाधिक शोषित घटकामध्ये भारतीय स्त्रियांचा समावेश आहे. भारतातील लिंगभेदावर आधारित समाजव्यवस्था व स्त्री विरोधी दृष्टिकोन यामुळे भारतीय स्त्रियांना अन्याय, अत्याचारास तोंड द्यावे लागत असून त्यांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

घरकाम करणा-या महिला समाजाच्या व अर्थव्यवस्थेच्या तळाच्या घटक आहेत. ज्यांचा इतर कामगारामध्ये समावेश होत नाही. घरकाम करणे आपल्याकडे खालच्या दर्जाचे ठरवले जाते. घरकाम करायला तेवढे महत्व दिले जात नाही. म्हणून समाजातील हा घटक अतिशय उपेक्षित, दुर्लक्षित व

शोषित जीवन जगत आहे. घरकाम करणा-या महिला या बहुतेक मागासवर्गीयच असतात. अशिक्षित महिलांना दुसरे कुठलेच काम मिळत नाही. शिवाय या कामाला कुठल्याही ट्रेनिंगची गरज नाही व सहज मिळत असल्यामूळे आपल्या कुटुंबाला हातभार लावण्यासाठी घरकाम करण्याकडे त्या वळतात. आपल्याकडे घरकाम करणारी बाई ही महत्वाची व्यक्ती असते. ती एक दिवस जरी आली नाही तरी घरातील मालकिणीची तारांबळ उडते. नोकरी करणा-या स्त्रियांचे हाल तर विचारुच नका. पण तरीही या स्त्रिया ज्यांचा सरळ संबंध रोज काम वाल्या बाईशी येतो, तिला समजून घेत नाही. त्यांच्या कामाच्या तुलनेत त्यांना अतिशय कमी पगार दिला जातो, वास्तवीक पाहता धुणी- भांडी, झाडू- पोछा, स्वयंपाक ही सुध्दा कष्टाची कामे आहेत. पण कुणीच ती गंभीरपणे घेतांना दिसत नाही. या महिलांना दिवसभर कमी वेतनात काम करावे लागते.

**विषयाची निवड :**

समान काम समान वेतन हे तत्व संघटित क्षेत्रात रुजले आहे. परंतू असंघटित क्षेत्रातील कामगार स्त्रिया या तत्वाच्या माध्यमातून अद्यापही वंचीत आहेत. अपमानास्पद वागणूकीपासून लैगिक सतावणूक व शोषणापर्यंत विविध प्रकारच्या समस्यांना असंघटित क्षेत्रातील कामकरी स्त्रियांच्या वाटयास येतात. विवाह, घटस्फोट, पोटगी, वारसा मुलांवरील तावा या सर्व बाबतीत निर्माण होणारे वाद सोडविण्यासाठी कायदे केले गेले आहेत. परंतू कायद्याच्या मार्गाचा अवलंब करुन न्याय आपल्या पदरात पाडून घेण्याची कुवत वा क्षमता फारच थोडया स्त्रियामध्ये आहे. बहुतांश स्त्रिया अन्याय सहन करीत मुकाटयाने आपले जीवन जगतात. म्हणूनच विवाहानंतर नव-याने टाकुन दिलेल्या स्त्रिया म्हणजेच परितक्त्या स्त्रियांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येते. अशा स्त्रियांना उदरनिर्वाहाचे साधन म्हणून धुणीभांडी करणे, फरश्या पुसणे, घरकाम करणे, यासारखी कामे करावी लागतात. अशा स्त्रियांचे जीवन कसे असते? त्यांना घरमालकाकडून कोणत्या प्रकारची वागणूक मिळते? त्यांच्यावर अन्याय अत्याचार केले जातात काय? अशा स्त्रिया लैगिंक शोषणांचे बळी पडतात काय? त्यांना कुटुंबात कशा प्रकारची वागणूक मिळते? त्यांचे कौटुंबिक जिवन कसे आहे हे जाणून घेण्याच्या उद्देशाने **" घरकाम करणा-या (मोलकरीण) महिलांच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : अमरावती शहरातील अर्जुननगर परिसर)"** या विषयाची निवड लघुशोध निबंधासाठी करण्यात आली आहे.

**संशोधन पध्दती :**

सदरील लघुशोध निबंधासाठी संशोधन पध्दतीतील प्राथमिक व द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. अमरावती शहरातील अर्जुन नगर परिसरातील एकुण ५० घरकाम करणा-या (मोलकरीण) महिलां उत्तरदात्यांची निवड करुन त्यांची मुलाखत घेण्यात आली. प्राथमिक सामग्रीत मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आला आहे. तसेच द्वितीय सामग्रीत विविध ग्रंथ, मासिके, वर्तमान पत्रे इत्यादी साहित्याचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात आले आहे. तथ्य संकलनाच्या आधारे निष्कर्ष स्पष्ट करण्यात आले आहे.

**लघुशोध निबंधाची उदिष्टये:**

१. घरकाम करणा-या (मोलकरीण) महिलांच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्यांचे अध्ययन करणे.
२. घरकाम करणा-या (मोलकरीण) महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
३. आधुनिक जीवन शैलीचा घरकाम करणा-या (मोलकरीण) महिलांच्या स्वतंत्र सामाजिक व सांस्कृतिक स्थितीवर पडलेल्या प्रभावांचे अध्ययन करणे.
४. शासनाच्या विविध योजनांचा घरकाम करणा-या (मोलकरीण) महिलांना कितपत लाभ झाला हे तपासणे.

सारणी क्र. १

कामाच्या ठिकाणी कोणती कामे करता? दर्शविणारी सारणी

| अ. क्र. | तपशील | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | घरातील धुणीभांडी | १६ | ३२.०० |
| ०२ | झाडू पोछा | १४ | २८.०० |
| ०३ | स्वंयपाक | १० | २०.०० |
| ०४ | इतर स्वच्छता | ०७ | १४.०० |
| ०५ | लहान मुलांचा सांभाळ | ०३ | ०६.०० |
| ०६ | एकूण | ५० | १००.०० |

सारणी क्र. १ मध्ये, उत्तरदाते हे कामाच्या ठिकाणी कोणती कामे करतात? याविषयी त्यांच्या कडून माहिती जाणून घेतली असता असे दिसून आले की, एकूण उत्तरदात्यापैकी १६ उत्तरदात्यांनी घरातील धुणीभांडी हे काम करतात. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण ३२ टक्के इतके आहे. तर १४ उत्तरदात्यांनी झाडू पोछा हे काम करतात असे म्हटले आहे. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण २८ टक्के इतके आहे. तसेच १० उत्तरदात्यांनी स्वंयपाक हे काम करित असतात. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण २० टक्के इतके आहे. इतर स्वच्छता हे काम करणा-यांची संख्या ही ०७ आहे. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण १४ टक्के इतके आहे. तर ३ उत्तरदाते हे लहान मुलांचा सांभाळ करतात. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण ०६ टक्के इतके आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, बहुतांश उत्तरदात्यांच्या मते, जास्ती जास्त उत्तरदाते हे घरातील धुणी भांडी हे काम करतात. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण ३३.४१ टक्के इतके आहे.

भारतामध्ये अजुनही महिलांना दुय्यम दर्जा दिला जातो. प्रत्येक क्षेत्रामध्ये महिलांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आपला ठसा कोरला असला तरी त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन मात्र बदललेला नाही. त्यामूळेच महिला ज्या ज्या ठिकाणी कामाला आहेत त्या ठिकाणी त्यांच्यावर अत्याचार केले जातात. कुटुंबामध्ये महिलावर कौटुंबिक अत्याचार केले जातात. मारहाण करणे, हुंडाबळी, घटस्फोट, इत्यादीद्वारे कुटुंबात महिलांचे मानसिक छळ केल्या जाते. समाजामध्ये हुंडा पध्दती, गर्भलिंग तपासणी, खून, बलात्कार, अपहरण, छेडछाड ईत्यादीद्वारे महिलांवर अत्याचार केले जातात

सारणी क्र. २

तुम्ही अत्याचाराला (शोषनाला) बळी पडता काय? दर्शविणारी सारणी

| अ. क्र. | तपशील | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | होय | २८ | ५६ |
| ०२ | नाही | २२ | ४४ |
| ०३ | एकूण | ५० | १००.०० |

सारणी क्र. २ मध्ये महिला उत्तरदाते हे अत्याचाराला बळी पडतात काय? याविषयी माहिती जाणून घेतली असता असे दिसून आले की, एकूण उत्तरदात्यापैकी २८ उत्तरदात्यांनी होय असे म्हटले आहे. म्हणजे ते अत्याचाराचे बळी ठरले आहे. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण ५६ टक्के इतके आहे. तर २२

उत्तरदात्यांनी नाही असे म्हटले आहे. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण ४४ टक्के इतके आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, बहुतांश उत्तरदात्यांच्या मते, त्या अत्याचाराच्या बळी ठरलेल्या आहेत. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण ५६ टक्के इतके आहे.

भारतीय घटनेच्या ३९ व्या कलमानूसार 'समान काम समान वेतन' म्हणजे स्त्री व पुरुष समान काम करित असल्यास त्यांच्या वेतनात कोणत्याच प्रकारची विषमता आढळून येणार नाही. दोघांनाही समान वेतन मिळेल. असे असले तरी वास्तव चित्र फार निराळे असल्याचे दिसून येते. आज अनेक खेडयामध्ये व शहरात पुरुष व महिलांच्या मजूरी मध्ये मोठया प्रमाणात तफावत असल्याचे दिसून येते. आजही शेतमजूर पुरुष व स्त्री यांच्या वेतनात फरक असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर शहरात घरकाम करणा-या महिलांना मिळणारी मजूरी ही अल्प असते. त्यांची मजूरी ही निश्चित ठरलेली नसते. त्यांची आर्थिक पिळवणुक व शोषण केल्या जाते. घरकाम करणा-या महिला या असंघटीत कामगारामध्ये मोडतात त्यामूळे त्यांच्या हक्कासाठी लढणारी अशी ही एकही संघटना पहावयास मिळत नाही.

सारणी क्र. ३
आपल्याला कुटुंबात समान दर्जा मिळतो काय? दर्शविणारी सारणी

| अ. क्र. | तपशील | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | होय | ६ | १२.०० |
| ०२ | नाही | ४४ | ८८.०० |
| ०३ | एकूण | ५० | १००.०० |

सारणी क्र. ३ मध्ये, महिला उत्तरदात्यांना कुटूंबात समान दर्जा मिळतो काय? याविषयी माहिती जाणून घेतली असता असे दिसून आले की, एकूण महिला उत्तरदात्यापैकी ६ उत्तरदात्यांनी होय असे म्हटले आहे. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण १२ टक्के इतके आहे. तर ४४ उत्तरदात्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना कुटूंबात समान दर्जा मिळत नाही. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण ८८ टक्के इतके आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, बहुतांश उत्तरदात्यांच्या मतानुसार त्यांना कुटूंबात समान दर्जा प्राप्त होत नाही असे त्यांना वाटते. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण ८८ टक्के इतके आहे.

स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन चुल आणि मुल एवढयापुरताच मर्यादीत होता. परंतू स्वातंत्र्य चळवळीने स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलविला. स्वातंत्र्य संग्रामात अनेक स्त्रिया हिरीरीने भाग घेवू लागल्यात. १९५० मध्ये तयार झालेल्या भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेवर भर देवून राज्यांनी स्त्रियांच्या सर्वागींण विकासासाठी विधायक कृती करावी असे नमुद केले. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय लोकशाहीने प्राचीन वेद, पुराणशास्त्र, व स्मृती यांच्या आधारावर अनेक कायदे करुन स्त्री विकासाला अनुकूल वातावरण तयार करुन दिले.

आज सुदृढ लोकशाही समाजवादाच्या तत्वावर जर देशाची उभारणी करावयाची असेल तर भारतीय स्त्रियांच्या राष्ट्रीय, सामाजिक व कौंटूबिक जीवनाच्या दृष्टिकोनात आमुलाग्र बदल करण्याची नितांत गरज आहे. घटनेतील स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुत्व ही मुलतत्वे स्त्रियांच्या मनात रुजविण्यासाठी त्यांच्या राष्ट्रीय, सामाजिक, आणि कौटूंबिक विचारसरणीत एकसूत्रता व सुसंवाद असण्याची गरज आहे व वरील तत्वे आचरणात आणण्यासाठी स्त्री शिक्षणाची अत्यंत गरज आहे.

२१ व्या शतकात मात्र चित्र बदललेले आहे. आता स्त्रिया सर्वच क्षेत्रामध्ये पुरुषावरोबरीने सहभागी होतांना दिसतात. भारतीय राज्यघटनेने

समानतेचा हक्क दिल्याने भारतातील स्त्रियांचा आर्थिक क्षेत्रात सहभाग वाढला आहे. मात्र, आजही स्त्रियांना निम्न प्रतिची कामे रोजगार क्षेत्रात करावी लागतात. भारतातील स्त्रियांचा रोजगार दर्जा हा त्यांना मिळणा-या उपेक्षांच्या वागणूकीचा प्रत्यक्ष पुरावा देणाराच आहे.

१९८५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केले की, जगाच्या एकूण लोकसंख्यपैकी १/२ स्त्रिया आहेत. जगातील कार्यबळापैकी २/३ स्त्रिया आहेत. परंतू त्यांच्या मोबदल्यात स्त्रियांना जागतिक उत्पन्नापैकी केवळ १/१० व जागतिक संपत्तीपैकी १/१०० हिस्सा मिळतो. एकाच कामासाठी अधिक तास काम करुनसुध्दा स्त्रियांना त्याच कामासाठी पुरुषांच्या मिळणा-या मजूरीच्या २/३ मजूरी दिली जाते. हे शेतमजूर चौकशी अहवालात नमूद करण्यात आले आहे. पितृसत्ताक कुटुंब पध्दतीत वडील, नवरा किवा मुलगा हेच कुटुंब प्रमुख असतात. कुटुंबातील निर्णय प्रक्रिया कुटुंब प्रमूखाच्या हाती केंद्रित झालेली असते. इंग्लंड व अन्य काही पाश्चिमात्य देशांमध्ये मतदानाचा अधिकार स्त्रियांना आंदोलन करुन मिळवावा लागतो. विभिन्न समाजातील स्त्रियांच्या स्थानाचा विचार केला तर स्त्रियाबद्लचा भेदभाव हा सार्वत्रिक असल्याचे दिसून येते. म्हणूनच समाजशास्त्रीय दृष्टिने दुर्बल घटकामध्ये सर्वप्रथम स्त्रियांचा समावेश केला जातो

**शिफारशी :**

१. कामगार कायदा लागू करुन त्यांना योग्य पगार दिला गेला पाहिजे.
२. जास्त वेळ केलेल्या कामाचा मोबदला त्यांना मिळायला पाहिजे.
३. आठवडयाची रजा किवा साप्ताहिक सुट्टी मिळली पाहिजे.
४. सरकारी सुटया मिळायला पाहिजे.
५. तसेच बोनस व नुकसान भरपाई त्यांना मिळायला पाहिजे.
६. वयाची मर्यादा आणि कामाचे तास ठरवले पाहिजे.
७. आरोग्याची काळजी व नुकसान भरपाईबद्दल नियम तयार करणे आवश्यक आहे.
८. त्यांच्या सुरक्षिततेची हमी व करार केले पाहिजे.
९. त्यांच्या शोषनाविरुध्द आणि जबरदस्ती, व्यापार याबद्दल कडक नियम करुन शोषनकर्त्याला कडक शिक्षा झाली पाहिजे.

**संदर्भसूची :**


१. अत्रे त्र्यंबक नारायण,"गावगाडा"मोटे प्रकाशन, दादर मुबई.तृतीय आवृत्ती १९५९
२. आगलावे प्रदिप,सामाजिक संशोधन पध्दती व तंत्रे,साईनाथ प्रकाशन,नागपूर. २००७.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर,'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती',सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ, पुणे. २०१३
४. प्रा. पी. के. कुलकर्णी, दलितांचे आणि आदिवासींचे समाजशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स ,पुणे. २०१२.
5. Acoff L. Russell,The Desigin of Social Research,The University of Chicago Press,Chicago (1961)
6. Bhushan B.

Website :

A. www.Google.com
B. www.shodhgnaga.co